लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार शासनाने वेळोवेळी दिलेल्या शासन निर्णय / शासन परिपत्रकातील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन परिपत्रक क्रमांक :- बीसीसी-२०१८/प्र.क्र. २७/१६-ब(सी) ,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**
**दिनांक :- १९ एप्रिल , २०१८.**

संदर्भ :-

१. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक :- बीसीसी-१०७५/ ३४८ / (ओ) ११/सोळा, दिनांक १६ नोव्हेंबर, १९७६.
२. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक :- बीसीसी-१०७७/१५२२ / ११/सोळा, दिनांक २९ ऑक्टोबर, १९७७.
३. शासन परिपत्रक क्रमांक : बीसीसी - २००२/ १९५२ / प्र.क्र. ६५ / २००२ / १६-ब, दिनांक०१ ऑक्टोबर, २००३.
४. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक :- बीसीसी-२००२/ १९५२/प्र.क्र.६५/१६-ब, दिनांक २१ एप्रिल, २००६.

## शासन परिपत्रक

श्री. लाड व पागे समितीने आपल्या अहवालात मेहतर, वाल्मिकी समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाििजिक उन्नतीसाठी तत्कालिन परिस्थितीचा विचार करता विशेष शिफारशी केलेल्या आहेत. त्या शिफारशींच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग व नगर विकास विभाग, या विभागांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय/शासन परिपत्रकाद्वारे देण्यात आलेल्या आदेशांचे / सूचनांचे शासकीय /निमशासकीय / महानगरपालिका / नगर परिषदा / मंडळे / महामंडळे / स्वायत्त संस्था / अनुदानित संस्था इत्यादींच्या आस्थापनेवरील कर्मचारी / अधिकारी या आदेशांची / सूचनांची अंमलबजावणी करण्याबाबत अनास्था दाखवित असल्याच्या तक्रारी येत असल्याने या विभागाने वेळोवेळी परिपत्रक / पत्र निर्गमित करुन या तक्रारींची दखल घेतलेली आहे. तरीसुध्दा अद्यापही सदर सूचनांची अंमलबजावणी होत नाही असे शासनाच्या निदर्शनास आलेले आहे.

२. महाराष्ट्र सफाई कर्मचारी आयोगाने सन १९९८-९९ च्या पहिल्या अहवालातील शिफारशींवर विभागामार्फत दि. ०१.१०.२००३ ला शासन परिपत्रक काढले गेले होते. शासनास प्राप्त झालेल्या तक्रारी / निवेदनांची दखल घेऊन शासन खालीलप्रमाणे पुन्हा निर्देश येत आहे.

अ) लाड व पागे समितीने शिफारस केल्यानुसार शासकीय / निमशासकीय मंडळे / महामंडळे / स्वायत्त संस्था / महानगरपालिका / नगरपालिका / खाजगीसंस्था तसेच कारखाने इत्यादीच्या आस्थापनेवर मेहतर व वाल्मिकी समाजाच्या उमेदवारांची नोकरभरती करताना त्याच्या वारसास/जवळच्या नातेवाईकास प्राधान्य देण्यात येते ते यापुढेही चालू ठेवावे, याबाबत आवश्यकता भासल्यास सेवाप्रवेशातील नियम शिथिल करुन त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी.

ब) सफाईगार कर्मचाऱ्याच्या वारसास / जवळच्या नातेवाईकास नोकरी देताना शासकीय / निमशासकीय कार्यालयातील सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी त्यांच्याकडील जेष्ठता यादीतील केवळ मेहतर व वाल्मिकी या जातींच्या उमेदवारांची, त्यांच्या जातीचा विचार करुन नव्हे, तर त्यांची शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन त्या आधारे त्यांची नेमणूक करण्यात येईल, यासंबंधी विशेष खबरदारी घेण्यात यावी.

क) मेहतर व वाल्मिकी म्हणून काम करणाऱ्या व्यक्तिची अनुसूचित जातींकरिता, वर्ग-४ मध्ये ज्या रिकाम्या जागा राखून ठेवलेल्या असतात, त्या जागांच्या संबंधात गणना करण्यात येणार नाही. त्यांची सरळसेवेने भरती करावी. मेहतर व वाल्मिकी यांच्या संख्येचा वार्षिक विवरणात दर्शविलेल्या वर्ग -४ च्या आकडयामध्ये समावेश होणार नाही. हे आकडे वार्षिक विवरणपत्रात स्वतंत्र प्रवर्गामध्ये दर्शविण्यात यावेत. वर्ग-४ च्या संबंधातील आकडयांमध्ये यांची संख्या समाविष्ट नाही, अशा अर्थाची टीप वार्षिक विवरणपत्राच्या शेवटी विनिर्देशपूर्वक समाविष्ट करण्यात यावी.

ड) मेहतर व वाल्मिकी समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी लाड व पागे समितीने केलेल्या शिफारशींवर समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, उद्योग, उर्जा व कामगार विभाग आणि नगर विकास विभाग यांनी वेळोवेळी शासन निर्णय / शासन परिपत्रक इत्यादी द्वारे आदेश / सूचना निर्गमित केलेल्या आहेत त्यांचे पालन सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, तसेच मंडळे, महामंडळे यांनी ही करावी.

इ) सफाईगारांची, त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर किंवा स्वेच्छा निवृत्तीनंतर रिक्त होणारी पदे व्यपगत करण्यात येऊ नयेत.

ई) सफाईगारांच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी शासनाने यापूर्वी वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश / परिपत्रक / सूचनांची अंमलबजावणी करण्यास शासकीय / निमशासकीय /महानगरपालिका / नगरपालिका /स्वायत्त संस्था इत्यादी आस्थापनेवरील कर्मचारी / अधिकारी हेतुपुरस्पर टाळाटाळ, कुचराई करतील त्यांच्याविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. बीसीसी-१०९३/६९७/१६-ब, दिनांक १२ जून, १९९५ अनुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

३.	सर्व मंत्रालयीन विभागांना या परिपत्रकाद्वारे पुन्हा एकवेळेस निर्देश देण्यात येत आहेत की, वरील बाबी त्यांच्या अधिपत्त्याखालील / प्रशासकीय नियंत्रणाखालील विभाग प्रमुखांना, कार्यालय प्रमुखांना, मंडळे/ महामंडळे/ महानगरपालिका/नगरपालिका/स्वायत्त संस्था/ अनुदानित संस्था इत्यादींच्या निदर्शनास आणाव्यात.

४.	सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१८०४२०११४०५४०९०७ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Tikaram Waman
Karpate

Digitally signed by Tikaram Waman Karpate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c97a9d6b23c34fddbfe8f6f6189c08328de56af131faf7d6c0a149c3a4cf1436, cn=Tikaram Waman Karpate
Date: 2018.04.20 11:42:20 +05'30'

**( टि. वा. करपते )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति**

१. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४. मुख्य सचिव/अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
५. सर्व मंत्रालयीन विभाग
६. सर्व विभागीय आयुक्त
७. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
८. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई
९. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
१०. प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई
११. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१२. सर्व आयुक्त, महानगरपालिका
१३. आयुक्त, समाज कल्याण, पुणे
१४. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
१५. आयुक्त, सेवायोजन, मुंबई
१६. सहाय्यक आयुक्त(मागासवर्गीय कक्ष), सर्व विभागीय आयुक्तांची कार्यालये
१७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१८. सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्त्याखालील विभाग व कार्यालय प्रमुख
१९. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने
२०. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोग, प्रशासकीय इमारत क्र. ०२, ३ रा मजला, रामकृष्ण चेंबुरकर मार्ग, चेंबुर (पूर्व), मुंबई-४०००७१.
२१. निवड नस्ती.